## BOMBAY ACT No. XLVII OF 1958.

## AN ACT TO REPEAL THE CENTRAL PROVINCES AND BERAR FINANCE ACT, 1938.

## सन १९५८ चा मुंबई अधिनियम ४७ वा.

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर "मुंबई राजपत्रांत" तारीख १३ मे १९५८ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

### मध्यप्रांत आणि वऱ्हाड वित्त अधिनियम, १९३८ रद्द करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, पेशा, व्यापार, धंदा किंवा नोकरी यांवर कर लादण्याची ज्यांत तरतूद केलेली आहे असा मध्यप्रांत आणि वऱ्हाड वित्त अधिनियम, १९३८ हा रद्द करणें इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी यावरून पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. या अधिनियमास मध्यप्रांत आणि वऱ्हाड वित्त (मुंबई अधिनियमाद्वारें रद्द करणें) अधिनियम, १९५८ असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. मध्यप्रांत आणि वऱ्हाड वित्त अधिनियम, १९३८ (ज्याचा यांत यापुढें उक्त अधिनियम असा उल्लेख केला आहे) हा, यावरून रद्द करण्यांत आला आहे. सन १९३८चा मध्यप्रांत अधिनियम, १३वा रद्द होणें.

३. (१) उक्त अधिनियम रद्द करण्यांत आला असला तरीहि, ३१ मार्च १९५८ रोजीं समाप्त होणाऱ्या वित्तीय वर्षाच्या संबंधांत किंवा त्या पूर्वीच्या कोणत्याहि मुदतीसाठीं लादलेली रक्कम, केलेली आकारणी आणि उक्त अधिनियमाचें कलम ३ ह्यांत उल्लेखिलेल्या कराची वसुली यांच्या कारणांकरितां, आणि उपरोक्त कारणांपैकीं कोणत्याहि कारणांशीं संबंधित असणाऱ्या किंवा त्यास आनुषंगिक असणाऱ्या कोणत्याहि कारणांकरितां तो अधिनियम आणि त्यान्वयें किंवा तदनुसार केलेले नियम आणि आदेश अंमलांत असण्याचें चालू राहील. बचाव.

(२) पोट-कलम (१) मध्यें समाविष्ट असलेल्या उपबंधांस बाध न येतां आणि त्यांना अधीन राहून, मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४ याचें कलम ७ हें, उक्त अधिनियम हा मुंबई अधिनियमाद्वारें रद्द झालेला अधिनियम आहे असें समजून, उक्त अधिनियम रद्द होण्याच्या संबंधांत लागू असेल.

४. या अधिनियमाच्या अंमलबजावणींत कोणतीहि अडचण निर्माण झाली तर राज्यसरकारला, मुंबई राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारें, अडचण दूर करण्यासाठीं त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीहि तरतूद करण्याचा किंवा तसा निदेश देण्याचा अधिकार आहे. अडचणी दूर करणें.

(True translation)

Y. H. PITKE,
Examiner of Books and Publications, Bombay.

## BOMBAY ACT No. XLVIII OF 1958.

## THE BOMBAY RACECOURSES LICENSING AND THE BOMBAY BETTING TAX ACTS (EXTENSION AND AMENDMENT) ACT, 1958.

मुंबई विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमति तारीख १० मे १९५८ रोजीं मिळालेली असल्यामुळें तो यावरून सर्व लोकांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

एन्. के. द्रविड,
मुंबई सरकारचे सचिव, विधि विभाग.